# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 21/06/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

### विनयभंग

पो.स्टे. मौदा :— दिनांक 16/04/2021 चे 18.54 वा. ते दिनांक 17/06/2021 चे 23.33 वा. दरम्यान आरोपी नामे— सचिन मस्के, रा. कुंभारपूर, ता. मौदा, जि. नागपूर याने फिर्यादी/पीडित वय 24 वर्ष हिला फोन करून अश्लिल बोलुन तिला शिवीगाळ केली. तसेच आरोपीने फिर्यादी व तिचे बहिनीच्या मोबाईलवर अश्लिल शब्दात मॅसेज पाठवून फिर्यादीसह दोन्ही बहीनींना व आई वडीलांना मारून टाकण्याची धमकी दिली. तसेच दि. 16/04/2021 रोजी वारंवार फोन करून व मॅसेज करून फिर्यादीची नातेवाईकात व समाजामध्ये बदनामी करीत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354 (डी), 354 (डी)(1), 354(डी)(2), 507 भादंवी. सहकलम 67 माहिती तंत्रज्ञान अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक जाधव मो.नं 9870328904 हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत 02 कि. मी अंतरावर मौजा पालोरा येथे दरम्यान फिर्यादी नामे— जितु निलकंठ वाघमारे(जखमी), वय 33 वर्ष, रा. पालोरा हे आपल्या दोन नातेवाईकांसोबत पालोरा येथील भकने ढाब्यावर जेवण करीत असतांना तिथे आलेले आरोपी क. 1) विनोद धनराज राजुके वय 26 वर्ष, रा. वार्ड क 03 चनकापुर खापरखेडा ता.सावनेर, 2) नितेश ज्ञानेश्वर वसु वय 26 वर्ष, रा. खंडाळा (पारडी), 3) रोशन अशोक वसु, वय 34 वर्ष, रा. प्लॉट नं 53 कामश्री नगर, नागपुर व 4) प्रदिप उर्फ पिंटु यादराव पायतोडे, वय 40 वर्ष, रा. वार्ड क्र. 03 खापरखेडा यांनी फिर्यादीस म्हटले की, ''आम्हाला जेवण करण्याकरीता जागा दया'' या कारणावरून झगडा भांडण करून आरोपीतांनी लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केले. तसेच फिर्यादी सोबत असलेला व्यक्ती राजु रघुनाथ भोयर यास हातबुक्कीने व प्लॉस्टीक खुर्चीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम 326, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री उबाळे 7498179174 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील भागेमाहेरी येथे दिनांक 20/06/2021 चे 19:30 वा. ते 19.45 वा. दरम्यान एमएच–40/एजी–3092 क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक नामे– गेंदलाल मडके(मृतक), रा. पिपळा ता. सावनेर हा भागेमाहेरी कडुन आपल्या गावी पीपळा येथे मोटरसायकलने जात असता मागुन येणारी एमएच–40/ बीजे– 7032 क्रमांकाची चारचाकी गाडी महींद्रा टियुव्ही 300 चा चालक आरोपी नामे – सुनिल लीलाधर काळे याने एमएच–40/एजी–3092 क्रमांकाच्या मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– गेंदलाल मडके रा. पिपळा हा जखमी होवुन मरण पावला तर आरोपी हा जखमी आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– असुरराज दामाजी शेंडे, वय 40 वर्ष, रा. भागेमाहेरी याने दिलेल्या रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. राठोड हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर मौजा खापा नगर परिषद सब्जी मार्केट येथे दिनांक 20/06/2021 चे 23:00 वा. ते दिनांक 21/06/2021 चे 05.00 वा. दरम्यान फिर्यादीचा पती नामे– देवमन सुरजुसे (मृतक) वय 40 वर्ष रा. किल्लापुरा खापा याने टि.बी च्या आजाराला कंटाळुन दारूच्या नशेत नगर परिषद सब्जी मार्केट च्या शेड मध्ये लोखंडी ॲंगल ला नायलॉन दोरी बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. अर्चना देवमन सुरजुसे, वय 35 वर्षे, रा. किल्लापुरा खापा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ विजय बारई 9822289572 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर